

MR
891.46182
Su 79 A

# गा मी ब्रह्म !

MR
891.461
82
Su79A

—नारायण सुर्वे

नारायण सुर्वे यांचे साहित्य

**ऐसा गा मी ब्रह्म ! १९६२, १९७१**

**माझें विद्यापीठ १९६६, १९७०**

**तीन गुंड आणि सात कथा (अनुवादित) १९६६**

Aisa ga mee brahma

# ऐसा गा मी ब्रह्म !

Narayan Surve

नारायण सुर्वे

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

Popular, Bombay

Library IIAS, Shimla
MR 891.46182 Su 79 A
00055481

MR
891.461 82
Su 79 A

55481
16.11.76

© नारायण सुर्वे, १९६२

पहिली आवृत्ती
१९६२ / १८८४
पुनर्मुद्रण
१९७१ / १८९३

मुद्रक : मोहन ग. शिराली, मोहन मुद्रणालय, अॅक्मे इस्टेट, शिवडी बंदर रोड, शिवडी (पूर्व), मुंबई १५ डीडी ◻ प्रकाशक : रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४ डब्ल्यूबी

*मातृभूमीसाठी तळहातावर शिर
घेऊन लढणाऱ्या शूर भारतीय
जवानांना—*

# प्रस्तावना

श्री० नारायण सुर्वे हे कामगार जीवनाशी केवळ समरस झालेले नव्हे, तर ते जीवन प्रत्यक्षात अनुभवणारे कवी आहेत. आजवरचे आमचे साहित्य हे बव्हंशी पांढरपेशा वर्गातील लेखकांनी निर्माण केलेले आहे. सदाशिवपेठी साहित्य ही डॉ० केतकरांनी वापरलेली संज्ञा अद्यापही सार्थ आहे. ही सदाशिवपेठ अर्थात् पुणे शहरापुरती मर्यादित नाही, ती सर्व महाराष्ट्र देशभर पसरलेली आहे. ती विशिष्ट जाती-पोटजातीपुरती संकुचित आहे असेही मानावयाचे कारण नाही. ती एक प्रवृत्ती आहे आणि ती सामाजिक जीवनाच्या प्रचलित व्यवस्थेतून उत्पन्न झालेली आहे. जातिभेदाच्या तटबंदीने एकूण समाजजीवनाचे विविध स्वायत्त प्रांत निर्माण करून या प्रवृत्तीला फार मोठा हातभार लावलेला आहे. अनेक मर्यादांनी ग्रासलेल्या अशा वाङ्मयाला तोचतोचपणा यावा, त्याच्या चतुःसीमांचा संकोच व्हावा यात नवल नाही. वाङ्मय निर्मितीच्या मीमांसा कोणत्याही आणि कशाही असोत, त्याचा विस्तार वाढायला हवा, समाजाच्या सर्व विभागांतून त्याचे पोषण व्हावे आणि जीवनाच्या साऱ्या सरहद्दीपर्यंत त्याचा संचार व्हावा, याबद्दल मला वाटते दुमत होऊ नये.

सध्या असे प्रयत्न होत आहेत यात शंका नाही. बंद असलेले अनेक दरवाजे उघडत आहेत. अडसर निखळून पडत आहेत. आजपर्यंत अन्याहत असलेल्या काही जीवनप्रांतांचे दर्शन कथा, कादंबरी, काव्य इत्यादी वाङ्मय-प्रकारांतून होऊ लागले आहे. श्री० नारायण सुर्वे यांचा प्रस्तुत काव्यसंग्रह म्हणजे असाच एक अभिनंदनीय प्रयत्न होय. श्री० सुर्वे यांच्या या काव्याचे वैशिष्ट्य असे की त्यांनी पुस्तकां–कपाटांत आपलीं स्फूर्तिस्थाने शोधलेली नाहीत. काव्यलेखनास, किंबहुना कोणत्याही लेखनास व्यासंगाची, जे अभिजात

आहे त्याचा अभ्यास करण्याची, आवश्यकता असते शंका नाही. परंतु व्यासंगाची फलश्रुती नक्कल काढण्यात झाली तर तो त्याचा दुरुपयोग झाला असेच म्हणावे लागेल. श्री० सुर्वे या प्रवृत्तीपासून अलिप्त आहेत. सभोवारच्या परिसरात ते काही श्रद्धा जागत्या ठेवून जगत आहेत आणि त्यांतूनच त्यांनी काव्याचा शोध घेतला आहे. चांगल्या काव्याला अशी निष्ठा आवश्यक असते आणि ती त्यांच्या ठिकाणी भरपूर प्रमाणात आहे.

श्री० सुर्वे यांची वरीचशी कविता लढाऊ वृत्तीची, समाजक्रांतीची उपासना करणारी, नव्या आनंदवनभुवनाचे मनोहर स्वप्न पहाणारी आहे. कवी अशा स्वरूपाच्या कविता लिहितो तेव्हा तो कोटल्या पंथाच्या व विचार-प्रणालीच्या जाहिराती वाटायला बसलेला नसतो. तो विचार त्याच्या ठिकाणी भावरूपता पावलेला असतो. त्याच्या व्यक्तित्वाचा तो एक अंगभूत भाग होऊन राहिलेला असतो. प्रेमासंबधीची, सौंदर्यासंबधीची व अध्यात्मासंबधीची भावना जेवढी खरी आणि उत्कट असते तेवढीच हीही असते. तेव्हा काव्याच्या भोवती धावळ्या लावून या विषयांना मज्जाव करावा असा आग्रह धरण्यात अर्थ नाही. तसा तो कोणी धरला तर कवी तो मानणारही नाहीत. कोणत्याही काव्यास आवश्यक असा प्रामाणिकपणा आणि उत्कट मानसिक अनुभव तेथे पाहिजे. ही एकच गोष्ट खरोखर महत्त्वाची असते. ती ज्याच्याजवळ असते तो 'तुतारी', 'नवा शिपाई' यांसारखी श्रेष्ठ काव्ये लिहू शकतो. ही प्रामाणिकता आणि उत्कटता ही सत्काव्याची आधारतत्त्वे. श्री० सुर्वे यांच्याजवळ या दोन्ही गोष्टी आहेत हे, 'क्षितिज रुंद होत आहे', 'या मेघांनो', 'पुन्हां भेटू सखे', 'क्षणांत जिंकीन', 'थरकूं नको' इत्यादी कवितांतून सहजपणे दिसून येते. त्यांचा शब्दही सामान्यतः त्यांच्या भावनेला अनुकूल, तिच्याशी सुसंगत असा आहे. प्रस्तुत संग्रहांत त्यांनी अनेक चांगली, ओजस्वी व भावपूर्ण काव्ये वाचकांना सादर केली आहेत. ती आज समाधान देतात आणि उद्याच्या वाढत्या यशाची अपेक्षाही निर्माण करतात.

**वि. वा. शिरवाडकर**
**( कुसुमाग्रज )**

# आभार

हा माझा पहिलाच काव्यसंग्रह.

जे जाणवले, काळजात सलले, तेच शब्दरूप घेऊन बाहेर पडले. यात माझा काहीच दोष नाही. कदाचित् काळाचा असण्याचा संभव आहे. असे बोललो तर तो कुणाला अहंकार वाटेल, तो असणे काही वाईट नाही. निदान कवीला तरी तेवढी माफी असावी.

मी स्वस्थ बसेन. शरीर स्वस्थ बसेल. पण आत्मा स्वस्थ बसूच देईना. शब्द मला ढकलीत राहिले. मी ढकलला जाऊ लागलो. विद्यमान मराठी कवितेत आपण कुठे आहोत? असाही केव्हा केव्हा मला भ्रम पडतो. पण का कोण जाणे, तरीही मी आपला लिहीतच आहे व लिहीत राहाणार आहे. त्याशिवाय मला गत्यंतरच नाही. जेव्हा काळजातला ठणका बंद होईल, जेव्हा मला शब्दांसाठी अडून बसावे लागेल, [असाही दिवस येणार आहे.] तेव्हा मात्र मला थांबावेच लागेल. तोवर तुमची वाट विचारीत, कधी मागचा आदर्श घेऊन, कधी स्वतःच चुकतमाकत, रस्ता शोधीत मला चालावे लागणार आहे. नाहीतर मी माझ्या जीवनाशी बेईमानी केली असे होईल.

जे लिहिले ते तुमच्या समोरच आहे. बरेवाईट सांगण्याचा अधिकार तुमचा आणि ह्या युगाचा. मी फक्त नाममात्रच.

महाराष्ट्रातील विख्यात कवी श्री० कुसुमाग्रज ह्यांनी संग्रहास प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

सुप्रसिद्ध लेखिका व 'नवयुग' साप्ताहिकाच्या संपादिका सौ० शिरीष पै ह्यांच्या प्रेमळ प्रोत्साहनाने मी ट ला ट जोडून का होईना पण कविता लिहू लागलो. माझे साहित्यक मित्र श्री० बाबुराव बागुल ह्यांचाही मी ऋणी आहे.

मित्राची निरोगी टीका साहित्यात किती महत्त्वाची भूमिका करते हे त्यांचेकडून मला शिकायला मिळाले. तसेच साहित्यिक कवीमित्र श्री० केशव मेश्राम, सदाशिव करंदीकर, श्रीकांत पुरोहित, राजा राजवाडे, सुरेश भट, माधव अत्रे, विनायक पाटील, श्रीनिवास कोर्लेकर व विनायक भावे ह्यांचे आभार मानावे तेवढे थोडे होतील.

ए/११, न्यू म्युनि० बिल्डींग
साने गुरुजी मार्ग ब्रीज
चिंचपोकळी, मुंबई ११

नारायण सुर्वे

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| प्रस्तावना | ... | ७ |
| आभार | ... | ९ |
| चार शब्द | ... | १३ |
| माझी आई | ... | १४ |
| क्षितिज रुंद होत आहे | ... | १६ |
| थोडी ठेव | ... | १७ |
| थांब ! | ... | १८ |
| या मेघांनो | ... | १९ |
| ऐसा गा मी ब्रह्म ! | ... | २१ |
| गलबलून जातो तेव्हां— | ... | २२ |
| युगस्वामी | ... | २३ |
| क्षण माघारी गेले | ... | २४ |
| आज मला उसंत नाही | ... | २५ |
| तेथेंच गा मुक्ति | ... | २६ |
| बालचंद्र | ... | २७ |
| क्षणांत जिंकीन | ... | २८ |
| पुन्हां भेटू सखे | ... | ३० |
| लुमुम्बास सलाम | ... | ३२ |
| अपराधी | ... | ३३ |
| तेवढ्या दर्शनानें | ... | ३४ |
| तुझ्या चक्षूंची म्या— | ... | ३५ |
| थरकूं नको | ... | ३६ |
| इशारा | ... | ३७ |

| | | |
|---|---|---|
| शब्दांचे ईश्वर | ... | ३८ |
| येतां का सांगाती | ... | ३९ |
| माफ करा | ... | ४० |
| २२ फेब्रुवारी | ... | ४१ |
| पहारा | ... | ४२ |
| अमुची दुनिया | ... | ४३ |
| कणिका | ... | ४५ |
| हे रिक्त हातांनो ! | ... | ४६ |
| येतेस दमून— | ... | ४९ |
| तोंवर तुला मला | ... | ५० |
| ऐसें दिसें चित्र | ... | ५१ |
| दोन दिवस | ... | ५३ |
| सुनें आभाळ | ... | ५४ |
| चंद्र | ... | ५५ |
| भारतीय जवानाचें पत्र | ... | ५६ |
| शहीद हो ! | ... | ५८ |
| त्यानें यावें | ... | ५९ |
| खुलेल गोमंतक जनजीवन | ... | ६१ |
| रथ त्याचा आवरा | ... | ६३ |
| सारें तुम्हां हातीं | ... | ६४ |
| पाहुणे | ... | ६५ |
| डोंगरी शेत | ... | ६६ |
| माझी माय आली | ... | ६७ |
| रवि आला घरा | ... | ६८ |
| गाडी आणा बुरख्याची | ... | ६९ |
| सराई | ... | ७१ |
| धरती महाराष्ट्राची | ... | ७३ |
| मेघ बरसे | ... | ७५ |
| गिरणीची लावणी | ... | ७६ |

# चार शब्द

रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे
कधी फाटका बाहेर कधी फाटका आंत आहे
कामगार आहे मी तळपती तलवार आहे
सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा करणार आहे.

थोडे साहिलेले, पाहिलेले, जोखीलेले आहे
माझ्या जगाची एक गंधवेणाहि त्यांत आहे
केव्हा चुकलो, मुकलो, नवे शिकलोहि आहे
जसा जगत आहे मी तसाच शब्दांत आहे.

रोटी प्यारी खरी आणखी काही हवे आहे
याचसाठीं माझे जग राजमुद्रा घडवीत आहे
इथूनच शब्दांच्या हाती फुलें ठेवीत आहे
इथूनच शब्दांच्या हाती खड्गें मी देत आहे.

एकटाच आलो नाही युगाचीहि साथ आहे
सावध असा तुफानाची हीच सुरवात आहे
कामगार आहे मी तळपती तलवार आहे
सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा घडणांर आहे.

# माझी आई

जेव्हा तारे विझू लागत
उंच भोंगे वाजू लागत
पोंग्याच्या दिशेने वळत
रोज दिंड्या जात चालत
झपाझप उचलीत पाय
मागे वळून बघीत जाय
ममतेनें जाई सांगत
नका बसू कुणाशी भांडत
वर दोन पैसे मिळत.

दसऱ्याच्या आदल्या दिनी
जाई पांचासह घेऊनी
फिरूं आम्ही आरास बघत
साऱ्या खात्यांतून हुंदडत
किती मज्जा म्हणून सांगू
शब्दसाठे झालेत पंगू
भिंगऱ्या पेपेंटे घेऊन
फुग्यांचे पतंग झोकून
जात असू पक्षी होऊन.

एक दिवस काय झालें
तिला गाडीतून आणले
होते तिचे उघडे डोळे
तोंडातून रक्त भळभळे
जोडीवालीण तिची साळू
जवळ घेत म्हणाली बाळू

मिटीमिटी पाहात होतो
माझे छत्र शोधीत होतो
  आम्ही आई शोधीत होतो.

त्याच रात्री आम्ही पांचानीं
एकमेकांस बिलगूनी
आईची मायाच समजून
घेतली चादर ओढून
आधीचे नव्हतेच काही
आतां आई देखील नाही
अश्रूंना घालीत अडसर
जागत होतों रात्रभर
      झालों पुरते कलंदर.

# क्षितिज रूंद होत आहे

आज माझ्या वेदनेला
अर्थ नवा येत आहे
आणि मेघांच्या डफावर
थाप विजली देत आहे
आज मरण आपुल्याच
मरणाला भीत आहे
आणि मृत्युंजयी आत्मा
पुन्हा धडक देत आहे
आज शुष्क फांद्यावर
बहर नवा येत आहे
भूमीच्या गर्भांमधुनी
बीज हुंकार देत आहे
आज सारे गगन थिटे
नजरेला येत आहे
काळोखाच्या तक्रकडींत
सूर्य गजर देत आहे
आज तडकलेलें मन
एकसंध होत आहे
आणि उसवलेले धागे
गुंफूनीया देत आहे
आज माझ्या कोरड्या गा
शब्दांत आग येत आहे
आणि नव्या सृजनाचें
क्षितिज रूंद होत आहे.

# थोडी ठेव

शिणलेली काया घेऊन
आलीस दमून भागून
लुटू लुटू चालणारीं तीं
पाडसें सोबती घेऊन
नाही देता आले छानसें
सानुल्या खेळणें घेऊन
म्हणून तरारून डोळां
आला कां ग निळा वरूण
घळघळे काठावरून

मला भरपूर वाढून
स्वतः अर्धपोटी राहून
काळोखातच फिरविशी
गार बोटें गालावरून
अर्ध मिटल्या पापणीत
स्वप्नें येती पंख लावून
बाचुकली होऊन कां ग
कुठेतरी जाती पळून
जाती जशा उल्का जळून

अशी थोडी ये ग जवळ
डोळयांच्या पाकळ्या पुसून
गळ्याखाली थांबवलेल्या
दुःखांचेहि हंडे ओतून
आधीच या भाराखालून
गेलोत पुरते वाकून
कर्दळी ग माझ्या सये
नको जाऊ गद्गदून
थोडी ठेव वीज जपून.

# थांब !

थांब ! प्रकाशाची चूड आतांच पेटवूं नको
आपुल्याच तोऱ्यांत पुढे पुढे सरकू नको
नाहीतर मलाहि हातीं खड्ग घ्यावे लागेल
मित्रा ! एवढा प्रसंग मजवर आणू नको

आतासाच कुठे तिचा डोळा लागलेला आहे
एक स्वप्न सारीका होऊन तिच्याशीं बोलत आहे
ऐन रंगात आल्या आहेत सुखादुःखाच्या गोष्टी
अशा वेळी अकुरा तुझे सैनिक धाडू नको

माझी गा दमून निजली खुराड्यांत चंद्रावळ
मीहि शब्द जुळवीत जागा आहे उशाजवळ
मलाहि ऐकू येते आहे वाऱ्याची सळसळ
वेळेवर येण्याचा नियम आज सांगू नको

क्षण उशीराने नभ ऋतु वारे कंपेल जग
त्यानेच फुलवंतीचें रंगेल ना स्वप्न मग
नच जुमानलेस तर खड्ग हाती घेईन
सज्जना ! असा प्रसंग मजवर आणू नको.

# या मेघांनो

ही कर्मभूमि शिववांची
ज्ञानेशांची अमरापुरी
पूल उतरून इंद्रधनुचा
या मराठीचिये नगरीं
या मेघांनो

संगर सत्याचा लढुनी
मोडून काढिला दंभ
त्या शहीदांच्या कबरीवर
वर्षवीत पहिले थेंब.

बंडवाला बांधव माझा
दडपिला भिंतीच्या आत
थांबून गजावर तेथे
ममतेनें गोंजारा पाठ

व्हा जुलुमाला सामोरे
व्हा जनजीवनाचे भूप
चेतवा वीज पणतीने
जगी चिरंतनाचे दीप

नव संस्कृतीचे व्हा भाट
गीत गर्जत या मुक्तीचे
फुलवीत पंख मेघांचे
दूत होऊन या शांतीचे

ह्या आनंदवन भुवनीं
घेऊन या अमृतकुंभ
ही सस्यशामला धरणी
भिजवून टाकू या चिंब

नांगरीले मनीचे वाफे
समतेचीं बीजें पेरून
सळसळा कोसळा येथे
कडकडा अंग मोडून

चालली जनतेची दिंडी
नवपंढरीच्या वाटेने
तारांगण मागून चाले
तुम्ही छत्र धरा थाटाने
या मेघांनो.

# ऐसा गा मी ब्रह्म !

घालीन मी साऱ्या । ब्रह्मांडास पाठी ।
सोडवीन गांठी । दिक्कालांच्या ॥

विश्वाचे गोकुळ । खेळे माझ्या दारीं ।
सूर्याची लगोरी । टिचवीन ॥

ढगांचा गा हत्ती । बांधीन मी दारीं ।
भरीन घागरी । अमृताने ॥

वाऱ्याची भिंगरी । अंगणीच फिरे ।
स्वर्गाचीं गोपुरें । तिडमीडे ॥

उभे करीन मी । वाकल्या आभाळा ।
शिक्षा केली त्याला । दंडवीन ॥

राईचा पर्वत । पर्वताची राई ।
दोन्हीं मज ठायीं । सामावली ॥

ऐसा गा मी ब्रह्म । विश्वाचा आधार ।
खोलीस लाचार । हक्काचिया ॥



55481

## गलबलून जातो तेव्हां—

गलबलून जातो तेव्हां तुझ्याच पवित्र कुशींत शिरतो
तुझ्या मखमली कवेंत स्वतःस अश्रूंसह झांकून घेतो

दिवसभर थकलेली तूं तरीहि चैत्रपालवी होतेस
कढ उतू जाणाऱ्या दुधावर स्नेहमयी साय धरतेस

पदराने घाम टिपतांना नजरेला नजर भिडते
माझ्या केसावरून तुझ्या पांचहि बोटांचें अमृत झरते

'किती वाळलात तुम्ही' पुन्हां व्याकुळ नजर मलाच शोधते
एवढ्या एकाच वाक्याने माझ्या हृदयाचे पोलाद होते

भुऱ्या जावळाआड आपुला सोनुला चंद्र स्वप्नधुंद असतो
एकदा त्याचेवरून; पुन्हा माझ्यावरून तुझा रेशमी हात फिरतो

जेव्हां तूच पाणावतेस तेव्हां छातीवरून ढग सरकतो
माझ्या देहाची ढाल होते माझा हात तलवार होतो

बाहेर फटफटते, ओले किरण खोलींत फडफडतात
रथचक्रासारखे पुन्हा पाय कारखान्याकडे वळतात.

# युगस्वामी

हलले जर नाही वाऱ्यानें तृणपान
पळणारे त्याचे खूर आणीन कापून

उडले न आभाळी जर मेघांचे बगळे
शिवून टाकीन विराट सागर बुधले

नवकोटी दीप जर नाही पेटले वर
ओंजळीत भरोनी उतरेन भूमीवर

जर नाही जुंपिला रथ सूर्याने आपुला
तर बांधून आणीन त्याला या नगरीला

वर दाही दिशांच्या खांबावरचा इमला
अन् सारी धरती माझा जमीन जुमला

मज करावयाचे नाही कुणासहि दास
धजू नये कराया मज भुरटा आदेश

मी वळणें घेईन तसेंच त्यांनीं वळावें
मी बैठक ठोकीन तिथेच त्यांनीं बसावे

भविष्याचे पांखरू माझ्या खांद्यावरतीं
अन् श्रमणाऱ्यांचा सूर्य आहे सांगाती

तुम्ही अशाश्वतेची उकरून काढा मढीं
मी शाश्वताचीहि रोवीन त्यावर गुढी

श्वासाश्वासांतून सुखाची मी पेरीन हमी
घडल्या जाणाऱ्या युगाचा मीच खरा स्वामी.

# क्षण माघारी गेले

मलाहि वाटते तिला हात धरून न्यावे
निळ्या सागराच्या कुशींत विलगून बसावें
विसरावे तिने अन् मीहि भोगलेलें दुःख
एकमेकां खेटून सारस जोडीने उडावें

झिमझिमत्या मेघधारेंत दोघांनीं भिजावें
तिच्या विलोरी चेहऱ्यावरील थेंब मी पुसावें
थोडे तिने रूसावें आणि मीहि समजवावें
क्षणांत ढगाळलेलें आकाश लख्ख व्हावें

रात्र संपूच नये अधिकच देखणी व्हावी
झाडें असूनहि नसल्यागत मला भासावीं
तिची रेशीम कुरळबटा गालीं झुळझुळावी
माझ्या बाहूंत पडून स्वप्नें तिनें पाहावीं

मऊ कुंतलांत फिरणारी बोटें झिणझिणावीं
तिच्या श्वासांचीं पांखरें गालांवर फडफडावीं
असे कैकदां वाटूनहि क्षण माघारी गेले
वाटेतच निरोप घेऊन 'लोकल' धरावी.

# आज मला उसंत नाही

जीवनाच्या कावडींतून
दु:खगंगेचा भार वाही
आज मला उसंत नाही
चार उष्टेचे दीनार
कलाखुती नक्षी मिनार
याच विटक्या शय्येवर
माझे मरण मीच पाही
फूल होऊन सजलों
चांदणें लेवून नटलों
भीर्रर्र गगनीं उडालों
आढळले पाश पायीं
जीवनाचे पिळून पिळे
जिव्हेवर ठोकून खिळे
हृदयावर डाग निळे
साहिले परी मुक्ति नाही
प्रकाशाचे छाटून हात
अंधार खाई दूधभात
रात्रीस म्हणावी प्रभात
उलटा येथें न्याय भाई
टपटपलों मेघांतून
सळसळलों लाटांतून
घळघळलों अश्रूंतून
रिक्तच शामल धरा ही
वादळाची करीन वात
बिजलीचा धरीन हात
तटतटा तोडीन तात
गाठीस तेवढी पुण्याई.

# तेथेच गा मुक्ति

असू दे जीवन । गेले कोळपून ।
त्यात मी ओतीन । संजीवनी ॥

पहाटेचा तारा । नाही आला घरा ।
तरीहि मी धरा । जगवीन ॥

सागराचा पेला । नाही मुखीं गेला ।
बाष्प आभाळाला । देववीन ॥

ऋतुराज सहा । नाही आले गेहा ।
तरी मी या देहा । फुलवीन ॥

आवर्तांचें धुकें । धूर क्षुब्ध ओके ।
चुकलेलीं टोकें । मेळवीन ॥

सारे हलाहल । उग्र कोलाहल ।
घोर दावानल । आचमीन ॥

अश्रूंच्या थेंबांत । पेटवीन वात ।
उजळीन पथ । जीवनाचा ॥

माझी खरी शक्ति । आहे जनभक्ति ।
तेथेच गा मुक्ति । चिरंतन ॥

# बालचंद्र

गोंदुनिया आभाळाच्या
मुखावर लाल तीळ
कांकणांचा गोल चुडा
हातीं भरी घननीळ

नीलाक्षीच्या अंगठीत
आंदण कां केला खडा
रांजणांत पाचूमोतीं
टाकुनिया भरी घडा

जर्दनीळा गोलकंठ
गळा नक्षत्रांचा हार
मोतीयांच्या गुंफणींत
कंठा शोभे मनोहर

आकाशाच्या तलावांत
दिसे धरतीचें बिंब
अधांतरी कमळाचा
कळा झुले ओलाचिंब

चांदण्याच्या वेलीवर
झुलते कां सोनफूल
मेघपानां आडुनिया
हंसतचि दावी भुल

दर्दभऱ्या कहाणीचा
शेवट गा आहे गोड
दुरावल्या आभाळाला
बालचंद्राचीच ओढ.

# क्षणांत जिंकीन

माझ्या मायदेशी
यात्रेच सर्वांनीं

फुगड्या घालाव्या
फुलां तारकांनीं

मेघानेही यावें
झुलत झुलत

विजेनेहि यावें
लवत फुलत

नटली नगरी
रंगानें गडद

पिवळ्या शेतांची
लावून हळद

निळ्याभोर पानीं
चांदण्याचा चारा

सह्याद्रीचा मोर
उभारी पिसारा

हिरव्या पक्षांनों
फुलवा ही बाग

भूपाळीत ओवा
मालकंस राग

अगा सूर्यदेवा
स्पर्श करा येथे

ऐशा भूमीपुढे
नमवावे माथे
ज्ञानीयांची कुणी
काढा वरें तीट
मराठीचा थाटा
संसार हो नीट
अमृतातें पुन्हा
पैजा मीं लावीन
थोर भल्या भल्या
क्षणांत जिंकीन

## पुन्हा भेटू सखे—

पुन्हा भेटू सखे केतकी वनात
वाहाते जीवन अश्रूंच्या पुरांत
दास्याचा खंजीर सलतो उरांत
अंधारुन येते अधिक आभाळ
कसाबसा दीप जळतो घरांत
आणाया निघालों मंगल प्रभात

इथे लाख जन जमती रणांत
उभा स्थिर राही सूर्य गगनांत
अग्नि पटवीला स्वातंत्र्य ज्योतीनें
कशी ठेवू सांग तलवार म्यानांत
कडाडे ग वीज वरती घनात

माझ्या पाठीमागें कारखाने आले
खडे सज्ज झाले गवताचे भाले
असा पेटलो मी जसा सूर्य तापे
तुरुंगाचे क्रूर गज वितळले
माझे हात शूर बंधूंच्या हातांत

कथायास गूज आला नाही वारा
वर पाहाताच तुटला कां तारा
कां ग डोळां आले काळे कृष्णमेघ
पापण्यांचा कां ग बावरे किनारा
काही किंतु नको आणू तूं मनांत

हार इथे नाही जीत जय बोले
माघारचा शब्द धूळ खात लोळे
मातीचें जेव्हा मी घेतले चुंबन
विजत्याचें बळ अंगीं संचरलें
धुळीचा ग दीप पेटे दिमाखात

## लुमुम्बास सलाम

माझ्या देशाची गंधवती हवा
माझ्या देशाचे जागणारे तारे
करीत राहतील रात्रभर
तुझ्या प्रिय कांगोवर पहारे

पहाटेस निघणारे जहाज
अर्घ्य अर्पिल पहिलें तुला
झुक् झुक् चालणारें इंजीन
शिट्यांची सनई ऐकविल तुला

माझ्या गगनींचा धवलचंद्र
तुझ्या सोनुल्यांचा होईल मामा
धरुन पाचूसम लालबोटें
माझ्या मराठीचा नाचेल नामा

हे शूर कांगोतील महाकवे
तुला सहस्र हातांचे प्रणाम
खोदतात मृत्यूसाठीं कबर
त्या आशिया-आफ्रिकेला सलाम.

# अपराधी

जगाच्याच कां ? स्वतःच्याहि नजरेंतून उतरलों आहे
आपलें मूल्य किती याचाहि अंदाज जमू लागलेला आहे.

ऋतुवारेच कां ? तिच्याहि नजरेंतून उतरलों आहे
दिसोंदिस मला माझीच करुणा येऊं लागलेली आहे.

ताऱ्यांच्या छायेखालीं, मित्रांच्या मैफलींत रंगलेलों आहे
कधीकाळी तिच्याहि नजरेंत स्वर्गसुख झालेलों आहे.

आज शरमतें आकाश मातीहि तिरस्कार धरून आहे
गुन्हा काय झाला कोणास ठाऊक; गुन्हेगार झालेलों आहे.

# तेवढ्या दर्शनानें

हात उंचावून माझीं फुलें स्वागतास जातील
त्याक्षणीं मी असेन कीं नसेन कोणास ठाऊक ?
जेव्हा तारे आप्त म्हणून माझ्या घरीं येतील
उभा दारीं असेन नसेन कोणास ठाऊक ?

येणाऱ्या नवरचनेस माझाहि सलाम सांगा
ह्याच भव्य क्षणासाठीं उभी हयात जाळली
काहीजण लोहघण हातीं धरून उठलों
वंडाव्याची कोटी बीजें याच भूमींत पेरलीं

ऋतुंनों, वाऱ्यांनों, फुलांनों, नाजुक पऱ्यांनों
जेव्हा ह्या देशांत याल कदाचित् मी नसेन
आताच तुमच्या हालचाली शब्दांत येतात
तेवढ्या दर्शनानेंच मी पुलकीत पावेन.

## तुझ्या चक्षूंची म्या—

तुझ्या चक्षूंची म्या । बाहुलीच व्हावे ।
डुंबूनी नहावें । तळ्यामाजी ॥

तुझ्या डोळीयांनीं । पाहावे खगोल ।
आकळावे बोल । आभाळाचे ॥

तुझ्या लोचनांत । यौवनांचे बाग
राग अनुराग । सारे काही ॥

तुझ्या चक्षूमाजीं । मातेचा ओलावा ।
शीतल गिलावा । पोळलेल्यां.........॥

तुझ्या डोळीयांत । नाही वंशभेद
परी अंधा खेद । वाटतसे ॥

तुझ्या लोचनांची । पापणी कां गळे ।
सूर्यास कां खळे । चक्राकार ॥

तुझ्या डोळीयांचे । उदास कां घट ।
उधळीला पट । शोधू पाहे ॥

लावून गा डोळे । किती ताटलास ।
काळया कातळास । ओीट न ये ॥

## थरकूं नको

आवडीने रांधलेला भात
खावयास मी नसेन घरांत
उद्याचे नवे रचाया व्रेत
मी हजर असेन सभेंत

उपाशीच वाट पाहू नको—

ताऱ्यांनीं भिजे उत्तररात्र
शहारे तुझे तरुण गात्र
याचक्षणीं मी गर्दींत मात्र
रंगवित असतो भूर्जपत्र

सरते प्रहर मोजू नको—

कधीतरी राक्षस येतील
आपुले दार ठोठावतील
घराची झडतीहि घेतील
कदाचित् तुलाहि नेतील

क्षणभरहि थरकूं नको—

# इशारा

येत आहोंत आम्ही त्यांना इशारा करा
घोषणांचे फलक हातीं धरावे नीट
आणि आपापसांत थोडे वाटावे मीठ
करा तेजासम नजर रोखून धीट
मुक्ततेचा ध्वज आज भिडवावा अंबरा—

गर्जना अशी करा मेघ मुके होतील
मशालींत आग थोडी वीजहि ओतील
मुक्तिध्वज सूर्यहि खांद्यावर घेईल
हलेल त्रिखंडहि असा पुकारा करा—

कारखान्यांचे भोंगे येती झुंजाया तोफा
झापा टाकीत निघतो धरतीचा वाफा
खड्गे होऊन उठतील लेखणीच्या नीफा
अक्षौहिणी सेनांचा अंगार ये संगरा—

नांगरून ठेविलीं बादशाही जहाजें
कफन अंगीं घालून सज्ज दर्याचे राजे
निळ्या पाण्यांत आज नवे उत्थान गाजे
घेरिला शूरांनीं पूर्व-पश्चिम किनारा—

रॉकेटांना उंच झोकणारे हेच बाहू
पृथ्वी हातावर तोलणारे हेच बाहू
आकाशींचे तारे खुडणारे हेच बाहू
झुगारून उठले शृंखलांचा पहारा.

# शब्दांचे ईश्वर

कवितेऐवजी रद्दी विकली असती तर बरे झाले असते
निदान देणेकऱ्यांचे तगादे तरी चुकविता आले असते
असे झाले नाहीं; आम्हीं शब्दांतच इतके नादावलों; वहकलों
असे झाले नसते तर कदाचित् इमलेहि बांधले असते

लोकसेवकाच्या भूमिकेंत सारे जीवन अदा केले असते
अडलेल्या हरेक याचकाने झुकून सलाम केले असते
' फियाट 'च्या मऊ गादीत बसून वाऱ्यालाहि गुलाम केले असते
जमलेच असते तर गावांत चार कारखाने बांधले असते

चषकांतील घोट गिळीतच गालावरचे चंद्र न्याहाळीले असते
रोमियोची मजनूची याद काढून (हाय) आयुष्य घालविले असते
दरेक सभासंमेलनाचे अध्यक्षस्थान आम्हीच भूषविले असते
दारिद्र्यांत दिवंगत झालेल्या कवीचे स्मारकहि बांधविले असते

आम्ही नसतो तर हे सूर्यचंद्र, तारे बिचारे फिके फिके असते
बापहो ! तुमच्या व्यथांना शब्दांत अमर कोणी केले असते
जन्ममरणाच्या प्रवासांत आम्हांशिवाय सोबतीस कोण असते
चला बरे झाले; आम्हांलाच कवितेंत खराब व्हायचे होते.

# येता का सांगाती

कुणा वाटे खंत । कुणा येई वीट ।
पोट दीड वीत । कुणा सुटे ॥

दारिद्र्याचें उन । जैसा चैत्रमास ।
झालों आम्ही दास । अगतीक ॥

कर्पुरासम मी । जाळतो आयुष्य ।
निर्मितो भविष्य । दुज्यासाठीं ॥

पाहातों गा नित्य । सत्याचें मरण ।
असत्य चरण । पूजतांना ॥

लटकाच भाव । तोंडावर सारा ।
अंतरी निखारा । वेदनेचा ॥

पुनवेचा चंद्र । आहे हृदयांत ।
परी या दास्यांत । अमावास्या ॥

उभा जगहाटीं । स्वतःला विकीत ।
स्वप्नांना फुंकीत । दमडीस ॥

ऐसा गदारोळ । माजतो बा येथें ।
किती खावे गोते । भोंवऱ्यात ॥

चालतों पुढेंच । येता का सांगाती ।
तेजाची दिवटी । धरोनीया ॥

# माफ करा

जगणे कठीण झाले आहे तरी जगायचे आहे
साहण्यासारखे अजून पुष्कळ साहायचे आहे
घडीभर अंधार राहिल नंतर पहाटच आहे

मग आजच सारीं आयुधें टाकून येऊंच का ?
माफ करा एवढे काम मला सांगूच नका !

आपलें म्हणून काही राहिले नाही माहित आहे
दिवस येतो, सुनाच जातो, हें सारे माहित आहे
कधी वाट मिळते, कधी मुकी होते, माहित आहे

चाचपीत, ठेंचाळत चालणे सोडून द्यावेंच कां ?
माफ करा एवढे काम मला सांगूच नका !

ताऱ्यांच्याहि पुढची दुनिया माझ्या नजरेंत आहे
एक फूल, एक हृदय, एक ग्रंथ नजरेंत आहे
नजर रोखून बसलों तो क्षणहि समीप आहे

काळोखाचे कैदी तुम्ही उगा धाक दावूच नका !
माफ करा एवढे काम मला सांगूच नका !

# २२ फेब्रुवारी

अशा नरकतुल्य जिंदगींत मीहि बेचैन होतो तेव्हा याद येते
डेकवर गस्त घालणाऱ्या तुमच्या पावलांमागे माझी वेदना पृथ्वी होते

सवाल एक होता तुमचा अमुचा; रोटी हवी जिंदगी हवी
अजुनहि सवाल तोच आहे; तुमचा अमुचा रोटी हवी जिंदगी हवी

तेव्हां खळाळले होतें पाणी तडाड उडाल्या शृंखला अस्मानांत
कडाड मोडलीं होतीं आम्ही रणगाड्याचीं हाडें; मुंबापुरी नगरांत

घेतले होतें नगर मुठींत, आकाशहि आले होते खुशींत
सातहि घोड्यांचे लगाम सैल करून सूर्य पळत होता पश्चिमेंत

बंडवाले तुम्ही, तळपलां; बंद झालांत अंधारकोठडींत
अजून जिवंत आहे मी, तुमचा कवि, राहीन कथा ऐकवीत

कसे होतां तुम्ही, कसे लढलें शहर, कसा घातला पोलादी घण
कसे पळाले फिरंगी, लढलांत रणरंगीं, रक्तात गेला रंगून

असाहि दिवस येईल तेव्हा मी तुमच्या हाताचा मुका घेईन
ज्या हातांनीं डागली तोफ त्या पवित्र हातांचे आशिश घेईन.

# पहारा . .

तुझ्या पापण्यांचा पहारा माझ्या शब्दांवर असतो
म्हणून माझ्या पद्यपंक्तींत व्यभिचाराचा अंश नसतो
सदैव माझ्या कवितेंत सत्याचा सहवास असतो.

मिळविलेले सारे साठवितस जपतेस फोडासारखे मला
जसे झाड जपते फुलास; आकाश जपते सूर्याला
सुखदुःखांतहि तुझ्या स्नेहाचा धूपदीप जळत असतो.

शिल्पकारासारखे टोकरूं लागतें पेन इच्छांचें घरटें
त्यावर तुझ्यामाझ्या आकांक्षाचे गुंडाळीत असतो तरटें
हिरव्या फांदीसारखा झुकलेला तुझ्या गालांचा गारवा असतो.

घरव्यांत उतरू लागते चांदणे मीच मयूर होतो
मोरपंख पसरून ताऱ्यांच्या रोखानें उड्डाण करतो
हर्षानें खिदळतेस आणि जीव डोळ्यांत झुरत असतो.

कधी शब्दांच्या पलटणी खांद्यावर रायफली घेतात
कधी डुलणारीं शेतें; कधी बंडवाले कामगार होतात
शब्द झुंजतात गरूडासम तुझ्या मुठींत मेघझरा असतो.

# अमुची दुनिया

लुत अंगावर सडलेली
तुमची दुनियाच निराळी
अमुची दुनियाच निराळी

आफ्रिकन अथवा इस्लाम
हिंदेशिया बर्मा सयाम
बंड करती जे जे अनाम
त्यांना हिमालयाचा सलाम
आम्ही पेरीत नसतो युद्ध
आम्ही निर्मित असतो बुद्ध
आम्ही गाळीत असतो घाम
कमवितो तयावर दाम
युगधारेत चिंब न्हालेली
अमुची दुनियाच निराळी

कधी शहराच्या रस्त्यावर
झेंड्यांचे झुलवित सागर
आम्ही काढितो भव्य जुलूस
सौख्याचे सजविण्या उरूस
बगलेंत धुरांडे दाबून
राजमुद्रा त्यावर ठोकून
रणपंडित लढतो आम्ही
बलवानच ठरतो आम्ही
अशी गाजते रोज धुमाळी
अमुची दुनियाच निराळी

आम्हां अस्मान ठेंगणे सारे
अमुचे मित्र हे तारे वारे
घण घेऊन सूर्य ये कामा
ढग प्रणाम करती आम्हां
साऱ्यांतून शेतमळ्यांतून
या देशाच्या दरीखोऱ्यांतून
गंगेच्या नील लहरींतून
धरतीच्या तरू पर्णांतून

आम्ही उभेच सांजसकाळी
अमुची दुनियाच निराळी.

# कणिका

माझी जखम जेव्हा घेतें आभाळाचें रूप
त्याच व्यथेनें कां जळती सूर्य-चंद्राचे दीप

तुम्ही झालांत युगग्रंथांतील एक पान
शिकविल्या अर्थांचे ध्वज धरून निघालो
काही उरलेच नाही गमाविण्या जवळ
आता मातीसह आकाश घेऊन निघालो

माझीहि अन्तयात्रा राजपथावरून सरकेल
कुणीतरी अजान देईल ; कुणातरी हुंदका फुटेल

हे कारखाने गिरण्या आमुच्या दुनियेचे अलंकार
लक्ष तारे माळून मोरपिसें खोवून सौंदर्य इथून येणार
ह्या झोतभट्ट्या, गोद्या, लोहरूळ, हे गजबजलेले रस्ते
हा फौजफाटा निघणार शस्त्रें घासून दारिद्र्याच्या सहाणेवर.

## हे रिक्त हातांनो !

हे हातांनो रिक्त !
माझ्या दैवतांनो !

तुम्ही बोटांच्या परिसाने
शृंगारिली अनंत भुवनें
तीक्ष्ण नखांच्या पिंजणीनें
पिंजलीं कापसाचीं वनें
दळीत गेलें युगचक्र
नाही केली भृकुटी वक्र
मुग्ध राहिलात राबत
साखळदंडांत पिचत

हे थोर किमयागारांनो !

गिरणीच्या चिमणीवर
थांबतो सूर्य क्षणभर
पाहतो कौशल्य बोटांचें
भिरभिरत्या पांखरांचें
घामांत निथळतो राम
कामांत दंग असे घाम
नाही चिंधीहि अंगावर
मुके राबता साच्यावर

यंत्रावर जळणारांनो !

आकाश मापणारी मान
साहेबापुढें होई सान
कुरकुरे पेनचे संगित

यांतच दडतें इंगित
खर्व-निखर्वांचे आंकडे
गणित बुजतें बापुडे
शिणतो मेंदू ये चक्कर
नफ्याचे सरे ना लष्कर

मुकें दुःख गिळणारांनो !

शेतावर माचा रचून
करितो मोत्यांची राखण
खसखसा कापतो विळा
आशेने करितसे गोळा
मळणीच्या खळ्याभोंतीं
चुरडती पिवळी पातीं
तरी नाही पोटांत अन्न
कंदमुळयांत गुजराण

नांगराच्या तप्त फाळांनो !

युगाचे तुडवीत पथ
गडगडत गेला रथ
हाकांनीं उठविले वेद
शुद्र झाला येथेंच स्वेद
तेंच केलें त्यांनीं संचित
तुम्हां ठेविलें वंचित
न्याय मिळेल कां येथ
आशेनें राहिला पाहत

हे माझ्या युगपुरुषांनो !

याचनेसाठीं झुकलेले
ममतेसहि मुकलेले
पराक्रमाने रंगलेले
बंदीगृहांत गंजलेले
जीवनास कवळणारे
मृत्यूसहि आवळणारे
झऱ्यांसम स्रवणारे
यमुनेसम वाहाणारे

जीवनाच्या शिल्पकारांनों !

हाताच्या सहस्रसूर्यांनों
प्रकाशाच्या तेजोगोलांनों
यंत्राच्या टणक दांत्यांनो
मातीच्या हिरव्या पात्यांनों
मुठींचे ध्वज उडवावे
वाऱ्यावर हंस सोडावे
करावा यात्रेस प्रारंभ
नव्या सृजनास आरंभ

नवे युग रचणारांनों !
हे रिक्त हातांनों !!

# येतेस दमून—

खुराड्यांतील जग माझें
उठतें ग कलकलून
तूं येतेस जेव्हां दमून

खिडकींत येऊन बसे
आकाशाचें पांखरू छान
तूं येतेस जेव्हां दमून

गोबऱ्या गोबऱ्या गालाचा
ससा नेमका उठे हंसून
तूं येतेस जेव्हां दमून

तूं येतेस जेव्हां दमून
येती श्वासच परतून
घरांत शीतळसें उन.

# तोंवर तुला मला

याच वस्तींतून आपला सूर्य येईल
तोंवर मला गातच राहिलें पाहिजे
नगर वेशींत अडखळतील ऋतु
तोंवर प्रिये जागत राहिलें पाहिजे

तुझे कुंतलहि आताच विंचरून ठेव
अंबाड्याच्या पेडांत फुलें मी खोंवीन
माझ्या डोळ्यांच्या ऐन्यांत पाहून घे रूप
तुझ्या कानांच्या पाळीत तारे मी खोवीन

कालच्या सभेंत गाईलेले मी गीत
ज्यांत तुझ्या माझ्या आशांचे खजिने होते
त्या ओळीहि ओठांवर घोळवून ठेव
ज्यांत तुझ्या माझ्या सुखाचे छबिने होते

आणखी एक काम करावे तूं लगेच
फाटक्या कोटासहि टाके घालून ठेव
फुलें हुंगीतच जाऊं दोघेहि गर्दीतून
तुझी रेशमासम बोटें दंडात ठेव

याच वस्तींतून आपलें सुख येईल
तोंवर तुला मला जागलेच पाहिजे
दारावर येतील सोनेरी मनोरथ
तोंवर प्रियें वाट पाहिलीच पाहिजे.

# ऐसे दिसे चित्र

उद्याच्या युगाची । दिसे नवसृष्टि ।
आनंदाचि वृष्टि । चोहीकडे ॥

नसे तेथे खंत । नसे जात पंथ ।
अवघा सुपंथ । जीवनाचा ॥

स्वेदाच्या थेंबांत । न्हाते गा धरणी ।
अर्घ्य गे तरणी । प्राशुनिया ॥

यंत्राच्या हातानें । उभारी गोपुरें ।
अज्ञात शिखरें । धुंडाळाया ॥

चवऱ्या ढाळीत । वात वाहे तेथे ।
ताड माड माथे । घुसळीती ॥

इंद्रधनु फित । मानवी दंडास ।
सातहि खंडास । सात रंग ॥

नक्षत्राचीं फुलें । घालुनि गळ्यांत
मळणी खळ्यात । करी ब्रह्म ॥

कुंकवाचा चंद्र । डोईवर घडे ।
चाले नार पुढे । हंसगति ॥

चंद्राचा सिग्नल । पडतो गा जेव्हा ।
राज्यांचा गा थवा । पर खोली ॥

श्रम आणि सत्य । सौंदर्याची गाथा ।
सारे झूट मिथ्या । याच लोकीं ॥

घट्टा ज्यांचे हातीं । त्यांचें असे राज्य ॥
अन्य दुजे त्याज्य । बलवंत ॥

सज्ज असे तेथें । श्रम इंद्रचाप ।
हरण्यास ताप । ब्रह्मांडीचा ॥

ऐसे दिसे चित्र । मज 'नारायणा' ।
किती सांगू खुणा । चिरंजीवी ॥

# दोन दिवस

दोन दिवस वाट पाहाण्यात गेले; दोन दुःखांत गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेंकडोंवेळां चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली
हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहींत; पण असेहि क्षण आले
तेव्हां अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धांवून आले
दुनियेचा विचार हरघडी केला अगा जगमय झालों
दुःख पेलावें कसे, पुन्हा जगावे कसे; याच शाळेत शिकलों
झोतभट्टींत शेकावें पोलाद तसे आयुष्य छान शेकलें
दोन दिवस वाट पाहाण्यांत गेले; दोन दुःखांत गेले.

## सुनें आभाळ

तिच्या मायेच्या हाताने
जोजविले आहे त्यांना
तिच्या स्नेहाळ बोटांनीं
घास भरविले त्यांना

आज नाही ती हयात
फक्त उरे परिमळ
माझ्या खोलीच्या आंतील
सुनें सुनें हो आभाळ.

# चंद्र

मन माझें तुझ्या लेथवर येते आकाश होऊन
खिळतें नजर लावून हृदय जातें मोहरून
मायेने कवळणारे हात भव्य लेथ चालवितात
विसरून जातोस तूं, तेंही भान विसरतात
तुझी रेखीव हालचाल तुझें एकाग्र जागृत मन
छानसे भट्टीचे तांबुस उतरते गालावर उन
कशी तटतटते शीर डोळ्यांत सूर्य लपतात
शहारतें पाहून गतीस हात जपण्या धावतात
चार सोबत्यांत शोभतोस जणूं पौर्णिमेचा चंद्र
परतते पुन्हा खात्यांत; लपवून उरांत चंद्र.

# भारतीय जवानाचें पत्र

आपलें लाल कौलांचें दोन खणी इवलें सुंदर घर
तांबड्या मातीच्या भिंती; त्यावर तूच चितारलेले मोर
घरासमोरचा जुना पिंपळ घेऊन चांदण्यांचा घडा
हिमालयाच्या रक्षणासाठीं जसा मी इथे बंदुक घेऊन खडा
चिमणे हंसपक्षी निजले असतील तुझ्या उबदार कुशींत
पिंपळावर आला असेल चंद्र; माझी याद सांगीत
हवी होतीस तूंही इथे पट्टे गोळ्यांचे झरझर सारीत
दोघांनीं मिळून आपण शत्रूस केलें असतें गारद

थांब; हुकुम झाला आहे, अग्निवर्षाव करतों, मग लिहितों.

निघालों तेव्हा सूर्य येत होता डोंगराआडून पेंगत
हिरव्या पर्णराजींत गांव होतें कमळासारखे उमलत
दंव होते लकाकत; पांखरें दिगंत व्यापाया निघालीं
शेतांत हारीनें वाकलेलीं कणसें तराारुन चमचमलीं
बांधून पाठीस भाकर निघालों आईचा आशीर्वाद घेऊन
दोन्ही भुजांच्या पंखांत उभी होतीस बोवडपंखी घेऊन
गांवकरी आले, पाठीवर हात फिरले, छातींत बळ आलें
जयजयकाराने इंद्रायणीचे; माझ्या गंगेचे पुन्हा काठ भिजले

थांब; हुकुम झाला आहे, पुढे सरकण्याचा, आधी पुढे सरतों.

हा भव्य हिमालय, चकाकणारे बर्फ, हीं उत्तुंग शिखरें
झुलतें इथे आकाश, चिंवचिंवत उडतीं नटरंगीं पांखरें
अशा थोर भूमींत जन्मलों आपण इथेंच जन्मला बुद्ध
सांडले अकारण रक्त चिन्यांनीं लादलें अकारण युद्ध

चिनी सैनिक हेरूं; पिटाळून लावूं भारतीय हद्दींतून
तेव्हाच घराच्या ओढीनें आमचे पाय वळतील सीमेवरून
सांग गांवकऱ्यांना हुश्शार रहा! आणि तूंही थोडी हो धीट
विजयी होऊन परत येणार आहे; तूंच ना काढलीस तीट

आगे बढो; हुकुम झाला आहे, आम्ही ध्वज उंचावून चालतों.

१२ नोव्हेंबर १९६२

# शहीद हो !

सूर्य तुम्ही तेजाळ आम्ही झुंजुमुंजु उषा
रक्तप्रकाशें तुम्ही जागविली पूर्व दिशा

फूल तुम्ही धरणीचे, आम्ही जागृत कळे
हांक येता वसंतीं, फुलवूं लक्ष मळे
गरूड तुम्ही, आम्ही तुमचच पंख
झडपूं पन्नग सारे जे करिती डंख

ज्ञानयाची ओवी तुम्ही, आमुची जिव्हा पोथी
साक्ष इंद्रायणीची जडलीं तेथेच नातीं
कळस तुम्ही शिखरीं, आम्ही पोलादी खांब
तांडवनृत्य तुम्ही, आम्ही जनशक्ति सांब

धैर्यमेरू हो तुम्ही, आम्ही उन्नत कडे
अन्यायीं वादळाशीं झुंजण्या ताठ खडे
श्वसन आणि सृजन तुम्ही, तुम्ही जनजीवन
अरुण तुम्ही, वरुण तुम्ही, तुम्ही चिरतरुण

शहीद हो ! गजर तुम्ही, आम्ही वारकरी
ध्वज तुमचा डौलाने नाचे खांद्यावरी.

# त्यानें यावें

असेल हिंमत लढणारांची
आणि सुळावर चढणारांची
निर्भय निधड्या छातीवरती
जुल्म रगडीत जाणारांची
त्यानें यावें—

कसले भेद अन् खुरटे वारे
मोजीत बसलां वरचे तारे
चुलींत ज्यांच्या विस्तव नाही
तेथे फुलतील कसे निखारे
उगा रूसावें—

रोज बडविती नवेच ढोल
हवेंत जिरती फुसके बोल
थंडे तावूत झाले तरीहि
उगाच बसले घालीत घोळ
किती दळावें—

हरला असेल त्यानें यावें
अन्यायावर तुटून पडावें
पीडला असेल त्यानें यावें
आणि व्यथेवर औषध न्यावें

खचला असेल त्यानें यावें
बोल धीराचे मनन करावे

वंचीत असेल त्यानें यावें
स्वतःस फुंकूत पावन व्हावें

लखलखल्या पात्यांनीं यावें
घरघरत्या जात्यानीं यावें
अणुअणूच्या कणाकणांतून
उसळत धुमसत पेटत यावें

जाळीत जावें; घडवीत यावें
संहारावें; उभवीत यावें
विराट श्रमसूर्याच्या कक्षेंत
स्वतःस उजळीत मुक्त फिरावें.

# खुलेल गोमंतक जनजीवन

पायवाटा अधीर आहेत आपल्या स्वागतास
पहाडांचे पहारेकरी डोळा भिडवून डोळ्यास
माडांच्या बाहुंनीं माळा टांगिल्या आकाशछतास
फुलें टोंचिली आहेत पानांनीं हिरव्या कोटास
उधान आले आहे दख्खनच्या दूधसागरास
वारा ओढीतो खाली रेंगाळणाऱ्या उन्हास
दुमदुमलें पुन्हा गोव्याचें फुलवंती आकाश

झरूं लागला रूपेरी प्रकाश !

भारतीय सेनेनें कूच केलें वादळगतीनें
स्वातंत्र्यसूर्य घेऊन निघाले अंधाराच्या रोखानें
पंखूट भुईस टेकून उडालींच जेट विमानें
पाणी कापीत जहाजें सुटलीं गोव्याच्या दिशेनें
हललीं लिस्बनची दारें तडकलीं तावदानें
मगरूर फिरंग्यांस आवळले पोलादी पंजानें
शेवटची बोट धरून पळाले लिस्बनच्या वाटेनें

मुक्त केला गोवा त्वरेनें !

वाहूं द्या दुधसागराचें पाणी बेटाबेटांतून
झिरपूं द्या कोवळे उन माडांच्या झापांतून
फुलतुरे डोकीस खोऊन हसू द्या माळरान
बसतील डोंगर पुन्हा हिरवे मुकुट लेऊन
पडावाचीं शिडें निघतील खारा वारा पिऊन

लाटांच्या ओठांवर खेळतील स्वातंत्र्यचरण
सौंदर्यानें खुलेल नवे गोमंतक नंदनवन

गोमंतक जनजीवन !

१८ डिसेंबर १९६१

## रथ त्याचा आवरा

ऐन रणांतुन सूर्यानें
कां घेतली माघार

मिट्ट काळोखाच्या दिशेचे
गाठू पाही भुयार

अजुन मुठीतलें खड्ग
नाही घेतलें मागे

अजुन झुंजाराचें गीत
आकाश करी जागे

अपयशाचे चार कडू
घोट गिळले जरी

विष पचवून उरलों
दहा अंगुळें वरी

रक्तांत भिजली पश्चिम
भानु होई घाबरा

अगा जरा धावून कुणी
रथ त्याचा आवरा.

# सारे तुम्हां हातीं

उठावे मातीचे फलक धरून
उठावे सागर चषक घेऊन
निघावे मेघांसारखे जमून
नव्याने विजेची तुतारी फुंकून

धरावा मुठींत नांगराचा फाळ
चलावें नभाचें नांगराया शेत
गव्हार्चीं पिवळीं कणसें घेऊन
उतरावे गात लुमुम्बाचें गीत

तार्‍यावर नवी वांधावीं धरणें
ग्रहांवर थोडी खेळवावी वीज
आणिक येथील कळकीचे छान
सूर्यासहि भेट द्यावें अलगूज

कैक युगें दूर रूसून चांदणी
तिला एक द्यावा वांधून सोपान
दोघांनीं आपुल्या कोमल करांनीं
घडवून आणावें चिर-मीलन

उठावेच आतां गर्वानेच पुढे
थोडी शिंपडून डोईवर माती
चला जिंकण्यास तरूण हातांनों
अगा या युगाचे सारे तुम्हां हातीं.

# पाहुणे

शब्द पाहुणे होऊन आले होते त्यांना आज पोंचवून आलों
कां कोण जाणे उदास वाटते; स्वतःलाच हरवून आलों
वळतांना उरांत आलें; यांच्यासोबत अस्सेच घर सोडावें
मन ढोर झाले होतें; घराजवळ येऊन भानावर आलों

अशी ताटातुटी होणारच, भयकंपित होऊन कसे चालेल ?
अर्ध्यावर चालून आलों; अर्ध्यावर वळून कसे चालेल ?
कालच कुणीसे डोकावून गेलें, त्यांना टाकून कसे चालेल ?
कंठ दाबीत पुन्हा निरोप देईन, त्याशिवाय कसे चालेल ?

# डोंगरी शेत

डोंगरी शेत माझं ग मी बेनू किती
आलं वरीस राबून मी मरावं किती

कवळाचे भारे बाई ग वेऊन चढावं किती
आडाचं पाणी बाई ग पाणी वडावं किती
घरांत तान्हा माझा ग तान्हा रडल किती
तान्ह्याचं रडं ऐकून पान्हा येईल किती

आलं आलं वरीस जमीन नांगरून
उभं पीक नाचे सोन्यानं फुलून
पर एक मेला सावकार टोला
हिसकून घेतो बाई सोन्याचा गोळा
असं उपाशी राहून ग आम्ही मरावं किती

म्हागाइनं बाई घातला हैदोस
गळा आवळी बाई सावकारी फास
कुनाचे देऊं आन कुनाचं ठेवूं
अशीच वर्सांवर वर्सं जातील किती

या संसारा बाई सांजी येईना
रक्त गाळून अंगा धडूत मिळंना
कष्टाचं फळ बाई पदरांत पडंना
टीचभर पोटाला, हातभर देहाला जपावं किती

अक्षय न्हाया कुंकू कपाळा
संसार वेलीच्या फुलवाया फुला
रूप नवं आणूं माय भरतीला
तोडूं जुलुमाचे काच, हे रावणी फास
एकीचं निशाण हातीं.

# माझी माय आली

माझी माय आली माझीया घराला
दवडवा हो द्वाही आज दाही दिशा
महाराष्ट्र देशीं उगवते उषा
स्वप्न शहीदांचें आलें उदयाला

फुंका शिंगकर्णे जयध्वज उभारा
सारा मायदेश फुलांनीं शृंगारा
अमृताची वाणी येई राऊळाला

सह्यगिरी संगे निवे रत्नाकर
कोटिकोटि दीप पेटवी अंबर
सूर्य-चंद्र बिंब शोभे पालखीला

ज्ञानीयांच्या देवा उघडा हो ताटी
नाथा तुकयानें बांधाव्यात गांठी
धावे इंद्रायणी पाय धुवायला

आज समर्थांच्या शब्दां मोल आलें
थोर शिवबाचे नेत्र ओले झाले
लवे कोटि माथा मुजरा करण्याला

कबीराच्या संगे मराठी अभंग
रंगुनिया नामा वाजवीं मृदंग
सारें भारत हो लागे डुलायाला

राजदंड घ्याया पुन्हा माय हातीं
नवसंस्कृतीच्या पेटवाया ज्योति
समतेचीं बीजें निघा पेरायाला.

# रवि चालला घरा

सोन्याचा ओलांडून उंबरा
चालला रवि आपुल्या घरा

ढग डुलत झुलत चालले
पक्षीगण परतु लागले
भव्य पूर्वेच्या नगरांत
नवलाख दीप झिळमिळे
चंद्रहि आणि दूधधारा

नदीतटीं बुडवून घागर
फिरी परते गवळ्याची नार
डोंगरावर गुराख्याचा पोर
हाकवीत वळवी खिल्लार
खांद्यावर टाकून नांगरा

तारकांची माळुनिया वेणी
भालीं चंद्रतिलक रेखुनी
गंध केवड्याचा उधळून
दारी उभी पृथ्वी हिरकणी
रंग येतो सृष्टि दरबारा

वाटेकडे लावुनिया डोळे
उभी असतील हंसरी फुलें
कांकणाच्या गोड धुंदींत
भाकरीचा वास दरवळे
बोलावी पायवाट घरा.

# गाडी आणा बुरख्याची

गाडी आणा बुरख्याची, बुरख्याची दोन चाकी

मखमलीचे पडदे ठेवा
रंग आभाळाचा द्यावा
टिकल्या चांदण्यांच्या लावा
चंद्रकोर तुरा खोवा

पश्चिमेच्या ढगांतील हो, ढगांतील जडवा सोनटिकी

फुलाने भरे जैसी धरा
गाडी सजवा ऐसी चतुरा
दो बाजूंचा मोर पिसारा
फुलवील चंदेरी वारा

झाडाच्या हो झुल्यावानी, गाडी अंग झोकी

धावे शामकर्ण जोडी
वळणे घेऊन नागमोडी
मागे रथावानी गाडी
आत आमची हंसजोडी

संगे धावुनिया वारा हो, वारा मान टाकी.

# सराई

पाजळून विळा कापू धान
सराई आली रे
नटलं शिवार अवंदा हळदीवानी जार
रूपवती धरणीनं केला शिणगार
मोत्यानं भरून जाईल माझं घरदार
किती व्हईल छान—

कणसांचा भारा आणून खळ्यावर टाकू
पेंडी उचलून गड्या नको रे थकू
ओवाळील माझी धणीन लावून कुंकू
पुजुनिया नवं धान—

टिपुर चांदण्याराती मळणी घालू छान
कोंडा सारा राधाराणी उडविला सुपानं
एकेक मोतीदाणा हसेल दुधानं
अमृताचें रसपान—

कसतो आम्ही जमीन आम्ही हिचे राजे
साक्ष देतील इथलीं दडलेलीं बीजें
कोण कुठून आलात तुम्ही वडे राजे
चालते व्हा गुमान

बांधावर लावून निशाण
खसखसा कापू या धान
राधा घेईल उंच तान
भरून जाईल सारं रान
चला मातीची राखाया शान
सराई आली रे.

# धरती महाराष्ट्राची

धरती महाराष्ट्राची आणिक अंबर महाराष्ट्राचें
निळाईच्या दर्पणांत झळके बिंब रविचंद्राचें

सजलशाम ही उभी द्वारका
गगनींच्या लेऊन तारका
शिखरीं तळपे शिवपताका
पायी आरती करतो चोखा
छत्रचामरें ढाळून वारा गुंजन करुनी नाचे

इथें वाजवी मेघ चौघडे
तालावर दौडतात घोडे
तलवारीच्या पात्यांमधुनी
पराक्रमाची वीज कडाडे
माती घुमते शौर्याभोंतीं गात ऋचा अन् वेंचे

तंतावर होनाची लावणी
मथुरेशी चालल्या गौळणी
हलगीवरची थाप ऐकता
रित्या होती वैखरीच्या खाणी
नवरसरंगीं दंग होऊनी इथे विठोबा नाचे

हरित तृण अन् निळे सलिल
इंद्रधनुसम सागरीं फेनील
हिरव्या पिवळ्या डोंगरी माथा
खेटून झुलतें आकाश फुल
किरणांचे नित भुंगे चुंबिती ओठ मृदुल कळयांचे

वेद ओतितो ज्ञान घागरी
कर्मयोग वाजवी तंबुरी
सत्य शिव श्रम सौंदर्याचा
चंद्र झळकतो नील अंबरी
घामाचे संगीत छेडिते तारा हृदय वीणेचे

नवी संहिता रचते गिरणी
फेर धरूनिया डोले धरणी
श्रमणाऱ्या भुजेंत गुंफते
हात आपुले वीजमोरणी
महारथ दौडतो दिगंती उडवित ध्वज यशाचे.

# मेघ बरसे

झिमझिम मेघ बरसे हां जी
रान पान सारं न्हातं हां जी
हंडे घेऊन मेघवल्लरी जी
उतरून येती गौळणी जी

दऱ्याडोंगर माथ्यावरी जी
झिम्मा खेळती नाचऱ्या सरी जी
कर्दळी वेली हळुवारी जी
शिरशिरे काटा तनुवरी जी

काळीभोर ढगांचीं जांभळं जी
पाणलोट वळे झुळझुळ जी
कळकीचीं धुंद सळसळ जी
रानभरी पावा अवखळ जी

शेतात माझी एक परी जी
पूर्ण चंद्रबिंब भूवरी जी
माझा हात रूमणीवरी जी
पाठीमागे माझी कस्तुरी जी.

# गिरणीची लावणी

सात वाजता सकाळी । भोंगा वाजवी भूपाळी ।
सुरू पहिली पाळी । मोठ्या डौलात ।
चाक फिरे गरगरा । सुत निघे भरभरा ।
नटवाया वसुंधरा । आमच्या घामांतून ॥

लेवून सूत नऊवारी । नखरा चावीणीचा भारी ।
कांडी गोल फेरे मारी । मग साच्यातून ।
झडपीनं घालून वारा । कापसा न देई थारा ।
जोडून तुटलेल्या तारा । तारा जुळवून ॥

ऐका घामाची कहाणी । फिरवी कळ ब्रह्मयावानी
तंतुतंतुला जोडूनी । वस्त्र गुंफून ।
रंग घेऊन आभाळाचा । हिरव्या सोनाळ शेताचा ।
सातरंगी इंद्रधनुत । वस्त्र भिजवून ॥

नाना ऋतुंच्या हो कळा । खुलवी माझा वस्त्रमळा ।
मरवा मोतीया पिवळा । तुरा खोवून ।
झोंबती चैत्राच्या झळा । भिजे श्रावणात शेला ।
उब चोरितो हिंवाळा । हेरून ऋतुंचा हा चाळा ।
विणतो माझा कबीर भोळा । जगा नटवून ॥

मलमल आणिक दोरवा । झोक साडीचा हिरवा ।
शालू पैठणी भगवा । झळके पितांबर ।
शोभे काळी चंद्रकळा । मोरपिसावानी डोळा ।
जणु गुलाबाचा कळा । टाकी भुलवून ॥

कौरवांचे दरबारीं । घाला घातला हो निरी ।
लाज राखाया श्रीहरि । गेला धावून ।
पुरवून धडुत अंगाला । कृष्णरूपें तो पातला ।
सोडविली द्रौपदीला । लाज राखून ॥

निर्मून धन आम्ही सारं । मालक असून झालों चोर ।
धनिकांचा वाढे जोर । ऐट दावून ।
पैका नाही इंधनाला । काय शिजवावं बोला ।
कां शिवावं पोटाला । टाके घालून ॥

55481
16.11.76

# ऐसा
# गा
# मी
# ब्रह्म !



अनेक मर्यादांनी ग्रासलेल्या वाङ्मयाला तोचतोचपणा यावा, त्याच्या चतु:सीमांचा संकोच व्हावा, यात नवल नाही. वाङ्मयनिर्मितीच्या मीमांसा कोणत्याही आणि कशाही असोत, त्याचा विस्तार वाढायला हवा, समाजाच्या सर्व विभागांतून त्याचे पोषण व्हावे आणि जीवनाच्या साऱ्या सरहद्दीपर्यंत त्याचा संचार व्हावा, याबद्दल दुमत होऊ नये. सध्या असे प्रयत्न होत आहेत यात शंका नाही. बंद असलेले अनेक दरवाजे उघडत आहेत. अडसर निखळून पडत आहेत.

नारायण सुर्वे हे कामगारजीवनाशी केवळ समरस झालेले नव्हे, तर ते जीवन प्रत्यक्षात अनुभवणारे कवी आहेत.

नारायण सुर्वे यांनी पुस्तकांच्य
स्फूर्तिस्थाने शोधलेली नाहीत. सभ
ते काही श्रद्धा जागत्या ठेवून 
त्यांतूनच त्यांनी काव्याचा शोध घे
बरीचशी कविता लढाऊ वृत्तीचं
उपासना करणारी, नव्या आनंदभुवनाचे स्वप्न पाहाणारी आहे. प्रामाणिकपणा आणि उत्कटता ही सत्काव्याची आधारतत्त्वे. सुर्वे यांच्याजवळ या दोन्ही गोष्टी आहेत हे त्यांची कविता वाचणाऱ्यांच्या सहज लक्षात येईल.

Library IIAS, Shimla
MR 891.46182 Su 79 A
00055481

रेखाचित्र : व्ही. एन्. ओके

किंमत ३ रुपये